प्रस्तावना

अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा

"जालना जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात सामाजिक न्याय विभागाची भूमिका"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा.

संशोधक

फप्पागिरे ज्योती धनंजय

मार्गदर्शक

डॉ.कोरपकवाड एकनाथ देवराव

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर.

संशोधन केंद्र

अर्थशास्त्र विभाग, शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि. लातुर.

एप्रिल - 2019

सामान्यत: फार पूर्वीपासून भारतीय समाज रचनेतील चातुर्वर्ण्यव्यवस्था व जातीय व्यवस्थेमुळे समाजातील दुर्बल घटक, मागासवर्गीयांना, विशेषत: अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीस अनेक वर्षापासून सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा सामुहिक उपभोगापासून तसेच नागरी व मानवी मुलभूत हक्क व अधिकारांपासून जाणीवपूर्वक दूर व वंचीत ठेवण्यात आले. भारतातील धर्मसत्तेने आणि अनिष्ठरुढी परंपरानी समाजातील विशिष्ठ व ठराविक अशा उच्चवर्णीयानाच राज्य सत्तेचा उपभोग, न्यायदान, शिक्षण घेणे, संपत्ती संपादन, अर्थाजन करणे इ. कार्याची मालकी हक्क व अधिकार बहाल केले. समाजातील दुर्बल घटकांना या पासून हेतूपूर्वक दूरच ठेवण्यात आले. याचा परिणाम म्हणून भारतीय समाजरचनेत सामाजिक, आर्थिक राजकिय, शैक्षणिक इ. क्षेत्रात फार मोठया प्रमाणात विषमता दिसून येते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर, समता आणि बंधुता या मुलभूत मुख्य संकल्पनेवर आधारलेल्या राज्य घटनेचा 26 जानेवारी 1950 रोजी स्विकार केला. तेंव्हा पासून भारत हे एक स्वतंत्र, सार्वोभोम लोकशाही, प्रजासत्ताक, गणराज्य म्हणून उदयास आले. भारताने समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार करुन कल्याणकारी राज्याची संकल्पना मान्य केली. या संकल्पनेवर आधारित नवभारताची निर्मिती करण्यासाठी समाजातील तळागाळातील दुर्बल घटकांचा, मागासवर्गीयांचा जो पर्यंत सर्वांगीण विकास होत नाही, तोपर्यंत कल्याणकारी राज्याची संकल्पना साकार होवू शकणार नाही. या बाबींची पुरेपुर कल्पना आपल्या घटनाकारांना होती. त्यामुळे त्यांनी दुर्बल घटकातील विशेषत: अनुसूचित जाती आणि अनुसुचित जमाती, भटक्याजाती, विमुक्त जाती यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक हितासंबंधीची जपणूक व संरक्ाण करण्यासाठी तसेच सामाजिक, आर्थिक अन्याय व सर्व प्रकारच्या शोषण व पिळवणूकी पासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी खास घटनात्मक तरतुदी केल्या आहेत.

प्रत्येक भारतीयाला शिक्षणाचा अधिकार आहे. दिशा दाखविणारी काही पायाभूत मुलतत्वे अशी आहेत. कमितकमी बालवाडी व प्राथमिक वर्गांना शिक्षण विनामुल्य असावे. प्राथमिक शिक्षण हे गरजेचे आहे.

शैक्षणिक क्षेत्रातल्या चिंतेच्या दोन मुख्य बाबी म्हणजे शिक्षणातून मिळणारा कमी दर्जाचा परिणाम आणि मुळातच कमी दर्जाचे शिक्षण उदा. कित्येक विकसनशील देशामधल्या प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पहिलीत नाव घालणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी शेवटच्या इयत्तेपर्यंत पोहोचणा-यांची संख्या 60% देखील नसते., शिवाय कित्येक देशामधील शिक्षक व विद्यार्थ्यांचे प्रमाण 40% पेक्षा जास्त असते तर कित्येक प्राथमिक शिक्षकांना शिकण्याची पुरेशी पात्रता नसते.

भारतीय राज्यघटनेनुसार शिक्षण हा विषय भारताचे केंद्रशासन व राज्यशासन यांच्या सामाईक यादीत असल्यामुळे ती त्यांची सामाईक जबाबदारी ठरते. शालेय शिक्षणाकरीता मध्यमवर्गीयासाठी अल्प शुल्काच्या अनुदानीत शाळा आणि त्याच्या खालोखाल मोफत शिक्षण देणाऱ्या स्थानिक प्रशासनाने चालवलेल्या शाळा अशी व्यवस्था असे.

प्राचीन काळापासून भारतीय समाजामध्ये सामाजिक व आर्थिक संरचनेची एक विशिष्ट चौकट सामाजिक व आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण करणारी व्यवस्था म्हणून जाती व्यवस्थेला तत्कालीन संरचनेने मान्यता दिली गेली. या जातीय व्यवस्थेने समाजात एक उतरंड निर्माण केली आहे. त्यामुळे देशाचा विकास खुंटला गेला.

1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर समाजकल्याण विभागाची स्थापना प्रत्येक जिल्हयात करण्यात आली. 1992 मध्ये समाजकल्याण मधून आदिवासी कल्याण विभाग तर 1991 मध्ये महिला व बाल विकास विभाग वेगळा करण्यात आला. यानंतर 2000 मध्ये समाज

कल्याण विभागातुन विमुक्त जाती, भटक्या जाती इ. मागास व विशेष मागासवर्ग कल्याण विभाग वेगळा करुन सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य हा स्वतंत्र विभाग सुरु झाला आहे. 'आयुक्त समाजकल्याण आयुक्तालय पुणे येथे असून यांच्या नियंत्रणाखाली मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व लातूर हे 6 प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण विभाग आहेत. तसेच 35 सहाय्यक आयुक्त महाराष्ट्रात असून जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यरत आहेत.

समाजातील आर्थिक दुर्बल व मागास घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहचवून त्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टिने सामाजिक न्याय विभाग काम करीत आहे. शासनाच्या बहुविध योजनांमुळे या घटकांचा शिक्षणाची, रोजगाराची व निवाऱ्याची व्यवस्था उपलब्ध होत आहे. लोकाभिमुख योजनांमुळे या घटकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी मदत होत आहे.

समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक प्रयत्न करुन विकसित समाज समुद्रासारखे जिवनमान प्राप्त करुन देणे हे समाजकल्याणात राज्याच्या सामाजिक आर्थिक शैक्षणिक विकासात सामाजिक न्याय विभागाचे योगदान मोलाचे आहे.

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत मागासवर्गीयासाठी विशेष शाळा सुरु करणे, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरु करणे. खाजगी वसतिगृहाला अनुदान देणे. परीक्षा फी, उपस्थिती भत्ता व शिष्यवृती देणे, मुलींसाठी मोफत सायकलींचे वाटप, विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश, आहार वाटप करणे इ.शैक्षणिक कार्य सामाजिक न्याय विभागातर्फे केले जाते. तसेच या विभागाद्वारे तळागाळातील गावपातळी पर्यंतच्या अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जमाती विशेष मागास वर्ग, इतर मागासवर्ग, अपंग व दुर्बल घटकांना शैक्षणिक आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक व कौटुंबिक लाभाच्या योजनांचा लाभ घेता यावा जेणे करुन या घटकांचे जीवनमान उंचविता येईल. यासाठी सामाजिक न्याय विभाग सतत प्रयत्नशील आहे.

थोडक्यात समाजातील अशा घटकांचा विकास करणे हेच सामाजिक न्याय विभागाचे उद्दीष्ट आहेत.

संशोधन साहित्याचे अवलोकन :-

संदर्भ साहित्य हा संशोधनाचा कणा असतो. कारण संदर्भ साहित्य म्हणजे मागच्या व पुढच्या सामुग्री लेखनाचा संबंध जोडणे होय. संशोधन विषयासंदर्भात पुर्वीचे संशोधन व नविन संशोधन यात पडताळणी करण्यासाठी संदर्भ साहित्य आवश्यक असते. कारण हा संबंध जोडल्याशिवाय संशोधनाचा खरा अर्थ समजत नाही.

प्रस्तुत संशोधनात जालना जिल्हयाचाच शैक्षणिक विकासात सामाजिक न्याय विभागाची भूमिका या विषयांच्या अध्ययनासाठी आवश्यक असणारा संदर्भ साहित्याचा आढावा सामाजिक न्याय विभागांशी संबंधीत पुस्तके, मासिके, माहिती पुस्तिका तसेच पुणे विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ येथे पी.एच.डी., एम.फील साठी सामाजिक न्याय विभगा जालना येथे प्रत्यक्ष जावून संदर्भ साहित्याचे लिखाण केले आहे.

पी.एच.डी. प्रबंधाचा आढावा :-

१) सुनिल अण्णा गोरडे (2008) यांनी

“औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या समाज कल्याणाच्या विविध योजनांवर केलेल्या खर्चाचे विश्लेषण” (1995-96 ते 2004-05) हा पी.एच.डी. अर्थशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ अंतर्गत पुर्ण केला यासंशोधनाचा उद्‌देश की समाज कल्याणच्या विविध योजनांवरील खर्चाच्या प्रवृत्तीचा अभ्यास करणे इ. उद्‌देश होते. या प्रबंधातील समाज कल्याणाच्या विविध योजनांवरील केलेल्या खर्चाचेविश्लेषण करण्यासाठी व्दितीय सामग्रीचा आधार घेतला असून या सामुग्रीच्या आधारे विविध योजनांचा निष्कर्ष पुढील प्रमाणे काढला आहे. सामाजिक न्याय विभागाच्या खर्चामध्ये इतर योजनांच्या तुलनेत मागास

प्रवर्गाच्या विकासासाठी दलित वस्ती ही योजना महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते परंतु दलित वस्ती योजनांवर होणारा खर्च अत्यंत अल्प असल्याचे आढळते.

२) कावडे विजय आनंदराव (1997)

यांनी **"विदर्भ भागातील माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या एक चिकित्सक अभ्यास"** या शोध प्रबंधात अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळते ती अपुरी असल्यामुळे गरजा भागत नाही असे मत व्यक्त केले. तसेच अनुसूचित जातीचे 80% विद्यार्थी सुटीच्या वेळात शैक्षणिक काम न करता मजुरीची कामे करतात. त्यामुळे त्यांची मोठया प्रमाणात शैक्षणिक गळती निर्माण होते. त्यांची परिस्थिती गरीबीची असल्यामुळे 40 ते 60% विद्यार्थी वसतीगृहात राहून शिक्षणाची गरज पूर्ण करत असल्याचे दिसून आले. परंतु वसतिगृहातील सुविधा अपुऱ्या असल्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती होत नाही. शालेय उपक्रमात या विद्यार्थ्यांचा सहभाग अतिशय अल्प असतो. घरची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्यामुळे त्यांना नोकरी किंवा धंदा करावाच लागतो. इतर विद्यार्थ्यांबरोबर येण्यासाठी आर्थिक अडचणीमुळे शिकवणी लावता येत नाही. हे विद्यार्थी शिक्षकांबरोबर मनमोकळया चर्चा करु शकत नाहीत. त्यांना अभ्यास करण्यासाठी घरी सुविधा नसते त्याचा परिणाम त्यांच्या गुणवत्तेवर होतो. तसेच आहार ही कमी दर्जाचा दिसून येतो. अशा प्रकारचे निष्कर्ष विजय काकडे यांनी आपल्या संशोधनात काढलेले आहेत.

3) माने गजानन भगवानराव (डॉ.बा.आ.मराठवाडा वि.) निष्कर्ष :-

१) माध्यमिक शाळेतील मुलांना मिळणाऱ्या पोषण आहार घटकांचे प्रमाण कमी असते.

२) पोषण आहाराच्या कमतरतेमुळे वयानुसार वाढ न झालेल्या विद्यार्थीनी आढळुन आल्या.

३)	ग्रामीण भागातील पालक शेतकरी शेतमजुर असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती कमजोर आहे.

**४)	एस.बी.शिंदे :- (1998) - श्री.एस.बी.शिंदे प्रा.एस.बी. घाटबळे** यांच्या मार्गदर्शनाखाली लघुप्रबंधाच्या माध्यमातून जालना शहरातील मातंग समाजाचे अध्ययन केले. एस.बी.शिंदे यांनी निष्कर्ष काढला की जालना शहरातील मातंग समाजाचे शिक्षणाचे प्रमाण अतिशय अल्प आहे. मातंग समाजात कमालीची निरक्षरता असून मातंग समाज गरिबी, दारिद्रय व अज्ञानामुळे शिक्षण घेत नाही. शिक्षणामुळे आपला आर्थिक, सामाजिक विकास होतो. हे त्यांच्या लक्षात आल्याचे दिसून येत नाही.

मागास प्रवर्गासाठी विविध संधी निर्माण करण्यासाठी समाजकल्याण विभागाचा खर्च आवश्यक वाटतो.

**५)	डॉ. विश्वास र. कदम (2005)**

डॉ. विश्वास र. कदम यांनी **"जालना जिल्हा परिषदेच्या उत्पन्न खर्चाचा अभ्यास"**(1981-2000) हा शोधप्रबंध पी.एच.डी. पदवीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला सादर केला. डॉ. कदम यांच्या मते जालना जिल्हा परिषदेचा समाजकल्याण विभागाचा खर्च अत्यल्प विभागाच्या खर्चाचे महसुल खर्चाशी प्रमाण 1.89 प्रतिशत आढळते. 1990-91 मध्ये हे प्रमाण 1.07 झाल्याचे दिसते. समाजकल्याण विभागाच्या खर्चामध्ये सातत्य दिसून येत नाही. समाजकल्याण खर्चाच्या वाढीची महसूली खर्चाच्या वाढीची महसुली खर्चाच्या वाढीशी तुलना केल्यास समाजकल्याणासाठी कमी तरतुद केल्याचे आढळते.

**6)	डॉ. बी.पी. भैरट :- (2002)**

डॉ. बी.पी.भैरट यांनी नोव्हेंबर 2002 मध्ये जिल्हा परिषदेशी संबंधित संशोधन कार्य अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत पूर्ण केले आहे.

"Financial management of Zilla Prishadas", A comparative study of Sangli and Aurangabad Zilla Parishadad".

या शिर्षकांअतर्गत 1988-89 ते 1997-98 या कालावधीसाठी संशोधन केले. औरंगाबाद आणि सांगली जिल्हा परिषदेचा समाजकल्याण विभागाचा खर्च कसा व किती आहे याचे विश्लेषण संशोधनास आढळून येते.

7) निखे निलिमा नारायण :-

निखे निलिमा नारायण यांनी सदर संशोधनात शाळांमध्ये राबवले जाणारे शालेय उपक्रम, उपक्रमांसाठी उलपब्ध भौतिक सुविधांची उपलब्धता व वापर विदयार्थी, शिक्षक व मुख्याध्यापक यांचा सहभाग व या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे वर्तन, परिवर्तन, प्रक्रिया व प्रमाणाचा शोध यांचे अध्ययन केले. यावरुन भोर व वेल्हे तालुक्यातील माध्यमिक शाळांमध्ये सहशालेय उपक्रमात विदयार्थी शिक्षक, मुख्याध्यापक यांचा सहभाग असून यासाठी भौतिक सुविधांची उपलब्धता आहे. शालेय उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मुल्यसंस्काराची रुजवण होऊन त्यांच्या वर्तनात परिवर्तन घडून येते.

८) **पिचड नलिनी (1999)-** यांनी आपल्या पीएच.डी. अभ्यासासाठी पश्चिम व उत्तर महाराष्ट्रातील महादेव कोळी समाजाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा, त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास हा विषय निवडला होता. या अभ्यासातुन त्यांना महादेव कोळी समाजाच्या आधीच्या पिढीची शैक्षणिक स्थिती दयनिय असल्याचे दिसून आले. त्यात 50% लोक निरक्षर असून 47% लोक माध्यमिक शिक्षण घेतलेले आहेत. तसेच या समाजात शेतीवर अवलंबित कुटूंबाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे.

9) गाडगीळ ए.व्ही. (1973) यांनी

"प्राथमिक शिक्षणाच्या विकासातील पुणे शिक्षण मंडळाची वाटचाल" या प्रस्तूत संशोधनात सामाजिकदृष्टया पुणे शहरातील प्राथमिक शिक्षणाच्या विकासाची चर्चा करणे नवीन समाविष्ट झालेल्या प्राथमिक शाळांचा अभ्यास मुलांना शाळेत न पाठवणाऱ्या दुर्बल पालकांच्या समस्यांची माहिती घेणे ही उद्‌टिष्टे समोर ठेवली होती. यामध्ये 1030 विद्‌यार्थी व 200 पालकांचा अभ्यास केला त्यावरुन शिक्षकांची अपुरी संख्या, प्रशिक्षीत व उच्चशिक्षित शिक्षकांची कमतरता, प्रभावी अध्यापन साहित्यांचा अभाव, निरक्षर व अशिक्षित पालक, गोंगाटामुळे अध्यापन व अध्ययनावर होत असलेला विपरीत परिणाम इ. समस्या आढळून आल्या.

10) **बारापांडा, निरुपमा (1997) यांनी**

"Teacher empowerment strategies to ensure community involvement in universalization of elementary education NCERT"

पटनोंदणी व ती टिकवण्यासाठी राबविलेल्या प्रकल्पांच्या यशस्वीतेचा शोध घेणे, समाजाचा सहभाग वाढविण्यासाठी शिक्षकांना सक्षम करणे, प्रकल्पाशी संबंधित नाविन्यपूर्ण घटकांचा शोध घेणे या उद्‌दिष्टांना अनुसरुन सबलपूर येथील 15 ग्रामीण व आदिवासी शिक्षण केद्रांचा अभ्यास केला. त्यानुसार 1961 मधील पटनोंदणी 36% वरुन 1996 पर्यंत 100% पर्यंत वाढली तर उपस्थिती 14% वरुन 93% पर्यंत वाढली. याशिवाय स्थलांतरामुळे 7% गळती झाल्याचे निदर्शनास आले. मेघपाल प्रयोगानुसार शिक्षकांना अभ्यासक्रम नियोजन सामाजिक उपक्रमांचे आयोजन, पाठयक्रम रचना, मुल्यमापन, आरोग्य मार्गदर्शन, संशोधन अशा कितीतरी भुमिका पार पाडाव्या लागतात.

विषय निवडीमागील भूमिका -

समाजातील वंचीत, दुर्बल घटक यांच्या शैक्षणिक स्थितीवर प्रकाश टाकणारे संशोधन फार कमी प्रमाणात आहे. जालना जिल्हयातील या घटकांचे शिक्षणातील प्रमाण फार कमी आहे. दुर्बल, वंचित घटकांच्या पालकांमध्ये

कमालीची निरक्षरता दिसून येते. हे घटक गरिबी, दारिद्रय व अज्ञानामुळे शिक्षण घेत नाही. शिक्षणामुळे आपल्या आर्थिक सामाजिक, विकास होतो. हे त्यांच्या लक्षात येत नाही. या अशा प्रवर्गासाठी विविध संधी निर्माण करण्यासाठी सामाजिक न्याय विभागांतर्गत योजनांवरील खर्च आवश्यक आहे. या खर्चाचा परिणाम शैक्षणिक विकासावर कितपत होतो. या योजना राबवत असतांना कोणकोणत्या अडचणी येतात यांचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :-

1) सामाजिक न्याय विभागांतर्गत राबवल्या जाणाऱ्या शैक्षणिक योजनांचा अभ्यास करणे.
२) सामाजिक न्याय विभाग निहाय शिक्षणावरील खर्चाचा अभ्यास करणे.
3) सामाजिक न्याय विभागाच्या ध्येय व धोरणांचा अभ्यास करणे.
४) सामाजिक न्याय विभागाच्या शिक्षणावरील खर्चाच्या परिणामाचा अभ्यास करणे.
५) सामाजिक न्याय विभागातर्गत शैक्षणिक योजना व विकासातील अडचणी लक्षात घेवून शिफारशी सुचविणे.

गृहितके :-

१) सामाजिक न्याय विभागाचे शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण वाढले आहे. परंतु विद्यार्थी संख्येचे प्रमाण वाढले नाही.
२) सामाजिक न्याय विभागाच्या शिक्षणावरील खर्चामध्ये वसतिगृहावरील खर्चाचे प्रमाण अधिक आहे.
3) सामाजिक न्याय विभागाच्या शैक्षणिक योजनांमुळे मागासवर्गीय, वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. परंतु सर्वच योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही.

4) सामाजिक न्याय विभागाच्या शैक्षणिक योजनांचा लाभ घेण्यात विद्यार्थी उदासीन आहेत.

५) सामाजिक न्याय विभागांतर्गत योजना राबविण्यात अनेक अडचणी आहेत.

संशोधनाचे महत्व :-

संशोधन ही प्रगतीची जननी असल्यामुळे संशोधन जर समाज उपयोगी नसेल तर समाजाची प्रगती होऊ शकत नाही. त्यामुळे संशोधनासाठी निवडलेला “जालना जिल्याच्या शैक्षणिक विकासात सामाजिक न्याय विभागाची भूमिका” हा विषय सामाजिक न्याय विभागांतर्गत राबवल्या जाणाऱ्या योजनांवर प्रकाश टाकण्याच्या दृष्टिकोनातून निवडला गेला आहे.

एका बाजूने जालना जिल्हयातील दुर्बल, वंचित घटकांच्या शैक्षणिक विकासातील सामाजिक न्याय विभागाचे योगदान अभ्यासतांना विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या समस्यांचाही अभ्यास करणे महत्वाचे आहे. त्यामुळे समाजकल्याण विभागांतर्गत येणारी वस्तीगृहे, शासकीय निवासी शाळा, आश्रमशाळा यांच्या सद्स्थितीचा अभ्यास करणे, शैक्षणिक दर्जा यावर प्रकाश टाकणे, सामाजिक न्याय विभागांतर्गत केल्या जाणाऱ्या खर्चाच्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी हे संशोधन महत्वपूर्ण ठरणार आहे.

अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा -

संशोधनाची व्याप्ती -

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे जालना जिल्हयापुरते मर्यादित आहे. या जिल्हयातील सामाजिक न्याय विभाग या एका विभागांतर्गत येणाऱ्या योजनांच्या खर्चाचा अभ्यास व परिणाम योच अध्ययन करण्यात येणार आहे.

संशोधनाच्या मर्यादा -

१) प्रस्तुत संशोधन हे केवळ जालना जिल्हा सामाजिक न्याय विभागा पूरतेच मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन केवळ सामाजिक न्यायविभागातंर्गत राबवल्या जाणाऱ्या योजना व खर्च यावर आधारीत आहे.

३) संशोधनाचा कालखंड 2008 ते 2018 असा असला तरी काही विशिष्ट काळ अंतराच्या आकडेवारीचेच विश्लेषण काही ठिकाणी आकडेवारी उपलब्ध नसल्यास करण्यात येईल.

तथ्य संकलन संशोधन पध्दती :-

सामाजिक संशोधन करताना तथ्यांचे संकलन करणे आवश्यक असते. तथ्य संकलनाचे दोन प्रकार आढळतात. एक म्हणजे प्राथमिक स्त्रोत होय व दुसरे म्हणजे दुय्यम स्त्रोत होय.

प्राथमिक तथ्य संकलनाचे स्त्रोत :-

१) **प्रश्नावली -** प्राथमिक तथ्य संकलनातील प्रश्नावली हे महत्वाचे साधन मानले जाते. प्रस्तुत संशोधनासाठी जालना जिल्हयातील सामाजिक न्याय विभागातील अधिकारी, वस्तीगृहाचे गृहपाल, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्‌यार्थी यांच्याकडून माहिती संकलित करण्यात येईल.

२) **निरीक्षण :-** तथ्य संकलनासाठी प्रत्यक्ष सामाजिक न्याय विभाग, वस्तीगृहे, निवासीशाळा, आश्रमशाळा यांना भेटी देवून तेथील समस्या उपयोजनांचे परिणाम या विषयी माहिती घेवून निरीक्षणे नोंदवण्यात येतील.

३) **अनुसूची :-** प्रस्तुत संशोधनात जालना जिल्हयातील सामाजिक न्याय विभागाअंतर्गत येणाऱ्या प्राथमिक आश्रमशाळेतील लाभार्थी यांच्याकडून अनुसूचीद्वारे प्रत्यक्ष प्रश्नावली भरुन घेण्यात येतील.

दुय्यम तथ्य संशोधनाचे स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधनात सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचे अध्ययन करण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. त्यासाठी विविध प्रकारची प्रकाशने कार्यालयीन दस्ताऐवज यांचा वापर, माहिती पुस्तके, यांचाही वापर करण्यात येणार आहे.

संशोधन प्रकरणाची रचना -

प्रकरण पहिले -

प्रस्तावना व सामाजिक न्याय विभागाच्या योजना

अ) प्रस्तावना - प्रस्तुत प्रकरण हे अभ्यास विषयाच्या प्रस्तावनेशी संबंधित असेन. प्रस्तुत प्रकरणात भारतातील शिक्षण प्रणाली याविषयी माहितीचा आढावा घेण्यात येईल. तसेच स्थानिक संस्था यांच्या योजना, शाळा, शैक्षणिक प्रगती यांचाही आढावा घेण्यात येईल. सामाजिक न्याय विभागाची माहिती. इ. चा समावेश या प्रकरणात असेल.

ब) सामाजिक न्याय विभागाच्या योजना

सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना कोणत्या आहेत याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे :-

संशोधन साहित्याचा आढावा आणि संशोधन पध्दती-

प्रस्तुत प्रकरण हे प्रस्तुत विषयाशी संबंधित असलेल्या साहित्याशी निगडीत असेल. यामध्ये वेगवेगळया अभ्यासकांनी, विचारवंतानी मांडलेल्या संशोधनात्मक लिखानाचा किंवा निष्कर्षाचा आधार घेवून संशोधन साहित्याचा आढावा घेतला जाणार आहे.

तसेच संशोधन पध्दतीमध्ये प्राथमिक व दुय्यम माहितीचे स्त्रोत, संशोधनाचे कार्यक्षेत्र, संशोधन विश्लेषणाची साधणे अभ्यास विषयाचे महत्व आणि अभ्यासाची मर्यादा यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे :-

जालना जिल्हयातील दुर्बल वंचित घटकांची सामाजिक व आर्थीक स्थिती.

या प्रकरणात दुर्बल वंचित घटक कोणते आहेत त्याचा अभ्यास करण्यात येईल. या घटकांची सामाजिक स्थिती कशी आहे, आर्थिक स्थिती याचा शिक्षणावर काय परिणाम होत आहे या सर्व घटकांवर प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण चौथे :-

जालना जिल्हयायातील सामाजिक न्याय विभागाच्या शिक्षणावरील खर्च-

समाजातील वंचित, दर्बल घटकांचा विकास करण्याकरीता सामाजिक न्याय विभागांतर्गत शिक्षण, उच्चशिक्षण, प्रशिक्षण, शिष्यवृत्ती स्वंयरोजगार, मागासवर्गीयांसाठी विशेष शाळा सुरु करणे, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरु करणे खाजगी वसतिगृहाला अनुदान देणे., परीक्षा फी, उपस्थिती भत्ता व शिष्यवृत्ती देणे. मुलींसाठी मोफत सायकलींचे वाटप, विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेष, आहार वाटप करणे इ. शैक्षणिक कार्यावर सामाजिक न्याय विभाग खर्च करते.

प्रकरण पाचवे :-

जालना जिल्हयातील सामाजिक न्याय विभागाच्या शिक्षणावरील खर्चाचे परिणाम-

सामाजिक न्याय विभागांतर्गत दुर्बल, वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात घेवून येण्यासाठी शासकिय अनेक योजना राबवल्या जातात. त्या योजनांवर,

अनुदानावर खूप खर्च केला जातो. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रगतीवर होतो. याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण सहावे -

सारांश, निष्कर्ष आणि उपाय योजना -

या प्रकरणात प्रत्येक प्रकरणाचा सारांश मुद्देनिहाय, प्रकरणनिहाय निष्कर्ष अभ्यास विषयाशी संबंधीत समस्या त्या सोडविण्यासाठी उपाययोजना इत्यादी घटकांचा समावेश करण्यात येणार आहे.

संदर्भसूची

पुस्तके :-

१) आगलावे प्रदिप (2000) “संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे”

२) पवार अशोक, “महाराष्ट्रातील आश्रमशाळांची सद्यस्थिती व 21 व्या शतकातील आव्हाने” योजना. विकास समर्पित मासिक सप्टेंबर 2008

३) खरात शंकर “भटक्या विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न” सुगावा प्रकाश, पुणे-2003.

४) चव्हाण पुष्पा - “विमुक्त जाती भटक्या जमातीच्या मुलींचे शिक्षण” महाराष्ट्र आश्रमशाळा शिक्षक संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन.

५) काळे भगवान (1988) “मराठवाडा काल आणि आज” संकेत प्रकाशन, जालना.

6) पुनियानी राम (2010) “सामाजिक न्याय एक सचित्र परिचय” वाणी प्रकाशन नवी दिल्ली.

७) सामाजिक न्याय विशेष सहाय्यक विभाग, महाराष्ट्र शासन ’वाटचाल सामाजिक न्यायाच्या दिशेने पुस्तिका’ 2009.

८) परिशिष्टे

प्रश्नावली

अनुसूची.

संशोधक

फप्पागिरे ज्योती धनंजय

मार्गदर्शक

डॉ.कोरपकवाड एकनाथ देवराव

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर.

संशोधन केंद्र

अर्थशास्त्र विभाग, शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि. लातुर.